RNI No. MAHBIL /2009/31733

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार—अ

वर्ष ५, अंक ८३] शुक्रवार, जुलै २६, २०१९/श्रावण ४, शके १९४१ [पृष्ठे २, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक १८३**

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमान्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यामध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश याव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### विधि व न्याय विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक १८ जुलै २०१९

### अधिसूचना

**फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३.**

क्रमांक संकीर्ण. ०८१६/४८३/प्र.क्र. ११४/का-११.— फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्याच्या कलम ७ तसेच कलम ९ याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून आणि याबाबतीत यापूर्वी काढलेल्या सर्व शासकीय अधिसूचना जेथवर रायगड जिल्ह्यातील पनवेल, उरण, खालापूर व कर्जत महसुली तालुक्यांशी संबंधित असतील तेथवर, त्या सर्व अधिसूचनांमध्ये अंशतः फेरबदल करून, महाराष्ट्र शासन, मुंबई येथील उच्च न्यायालयाशी विचार विनिमय करून याद्वारे, दिनांक २७ जुलै २०१९ पासून रायगड जिल्ह्यातील पनवेल, उरण, खालापूर व कर्जत महसूल तालुक्यांकरिता सत्र विभाग निर्माण करीत आहे आणि उक्त सत्र विभागाच्या सीमांच्या आत उद्‌भवणाऱ्या प्रकरणांची न्यायचौकशी करण्यासाठी पनवेल येथे अतिरिक्त सत्र न्यायाधीश हे पनवेल येथील सत्र न्यायालयाचे पीठासीन अधिकारी असतील, तसेच सत्र न्यायाधीश, रायगड-अलिबाग हे पनवेल येथील सत्र विभागाचे देखील सत्र न्यायाधीश असतील आणि त्यांना, योग्य वाटतील अशी कोणतीही प्रकरणे, उक्त सत्र विभागातील प्रकरणे, स्वतःकडे घेण्याचा अथवा सक्षम अधिकारिता असणाऱ्या दुसऱ्या कोणत्याही न्यायालयाकडे सोपवण्याचा किंवा त्यांना पनवेल येथील अतिरिक्त सत्र न्यायाधीश यांच्याकडे सोपवण्याचा अधिकार असेल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**यो. ही. आमेटा,**
शासनाचे सह सचिव.